मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# बारणेंना विक्रमी मताधिक्य देण्याची ग्वाही

## नेते व कार्यकर्त्यांच्या वैयक्तिक गाठीभेटी : मावळ तालुक्यात साधला श्रीरंग बारणे यांनी संवाद

**पिंपरी | प्रतिनिधी**

मावळ लोकसभा मतदारसंघातील शिवसेना-भाजप-राष्ट्रवादी व मित्रपक्ष महायुतीचे अधिकृत उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांनी मावळ विधानसभा मतदारसंघात आमदार सुनील शेळके, माजी राज्यमंत्री संजय तथा बाळा भेगडे, भाजपचे मावळ तालुका प्रचारप्रमुख रवींद्र भेगडे यांच्या निवासस्थानी जाऊन नेते तसेच कार्यकर्त्यांशी संवाद साधला. यावेळी मावळच्या आजी-माजी आमदारांनी श्रीरंग बारणे यांना तालुक्यातून विक्रमी मताधिक्य मिळवून देण्याची ग्वाही दिली.

शिवसेना-भाजप-राष्ट्रवादी व मित्रपक्ष महायुतीने अधिकृत उमेदवारी जाहीर केल्यानंतर बारणे यांनी आज (रविवारी) प्रथमच मावळ तालुक्यात प्रमुख नेते व कार्यकर्त्यांची वैयक्तिक भेट घेतली व विविध विषयांवर चर्चा केली. सर्व ठिकाणी बारणे यांचे उस्फूर्त स्वागत व सत्कार करण्यात आला. सर्वांनी एकदिलाने व मेहनतीने काम करून बारणे यांना ऐतिहासिक विजय मिळवून देण्याचा निर्धार केला.

आमदार सुनील शेळके यांच्या निवासस्थानी बारणे यांनी भेट दिली. त्यावेळी आमदारांचे वडील शंकरराव शेळके व परिवारातील सदस्य उपस्थित होते. शेळके परिवाराच्या वतीने खासदार बारणे यांचा सत्कार करून त्यांना निवडणुकीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. त्यानंतर बारणे यांनी आमदार शेळके यांच्याशी तालुक्यातील राजकीय परिस्थितीबाबत सविस्तर चर्चा केली. तालुक्यात राष्ट्रवादी व भाजप या दोन्ही पक्षांची मोठी ताकद असल्याने बारणे यांना तालुक्यात विक्रमी मताधिक्य मिळेल, असा विश्वास शेळके यांनी यावेळी व्यक्त केला.

माजी राज्यमंत्री संजय तथा बाळा भेगडे यांच्या निवासस्थानी देखील खासदार बारणे यांचे उस्फुर्त स्वागत करण्यात आले. त्यावेळी बाळा भेगडे यांचे बंधू विकास भेगडे व परिवारातील सदस्य, देहूरोड कॅन्टोन्मेंट बोर्डाचे माजी उपाध्यक्ष रघुवीर शेलार, शंकरराव शिंदे, शिवसेनेचे राजेंद्र तरस, सुनील तथा मुन्ना मोरे तसेच अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे हात बळकट करण्यासाठी तसेच 400 हून अधिक खासदार निवडून आणण्याचा भाजपचा संकल्प पूर्ण करण्यासाठी तालुक्यातील भाजपचे कार्यकर्ते जीवाचे रान करतील, अशी ग्वाही बाळा भेगडे यांनी दिली.

भाजपचे मावळ विधानसभा मतदारसंघ प्रचारप्रमुख रवींद्र भेगडे यांच्या निवासस्थानी भाजपचे तालुकाध्यक्ष भाऊ गुंड, संघटन मंत्री रवींद्र देशपांडे, बैलगाडा मालक संघटनेचे अण्णासाहेब भेगडे, मनोहर भेगडे, रघुवीर शेलार, संतोष दाभाडे, राजेंद्र जांभुळकर, चंद्रशेखर भोसले चऱ्होलीकर, राजेंद्र तरस, सुनील मोरे, संजय वाडेकर, वैभव कोतुळकर, अनंत चंद्रचूड, संदीप सोमवंशी, शुभम सातकर आदी प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



### सर्वांचे सहकार्य मिळेल असा विश्वास...

यापूर्वी दोन्ही निवडणुकांमध्ये भाजप कार्यकर्त्यांच्या पाठबळामुळे व मेहनतीमुळे आपण चांगल्या मतांनी विजयी झालो, असे नमूद करून या निवडणुकीतही सर्वांचे सहकार्य मिळेल, असा विश्वास खासदार बारणे यांनी व्यक्त केला. उद्धव ठाकरे यांच्या भूमिकेमुळे लोकसभेत काही काळ विरोधात बसावे लागले, मात्र त्या काळातही आपण कधीच भाजपच्या विरोधात बोललो नाही. कधीही चुकीचे काम केले नाही आणि करणारही नाही, असे बारणे यांनी स्पष्ट केले.यावेळी बोलताना उपस्थित नेते व कार्यकर्ते यांनी श्रीरंग बारणे यांना मावळ तालुक्यातून 'रेकॉर्ड ब्रेक' मते मिळवून देण्याचा निर्धार केला. खासदार बारणे यांच्या हॅटट्रिक बरोबरच मावळ तालुक्याला प्रथमच केंद्रात मंत्रिपदाची संधीही मिळेल.

# आरटीईअंतर्गत विद्यार्थी नोंदणी कधीपासून?

## राज्यात 75 हजार 856 शाळांमध्ये 9 लाख 71 हजार 203 जागा प्रवेशासाठी उपलब्ध

**पिंपरी| प्रतिनिधी**

शालेय शिक्षण विभागाने शिक्षण हक्क कायद्याअंतर्गत (आरटीई) केलेल्या बदलांमुळे आरटीई प्रवेश प्रक्रियेत यंदा मोठ्या प्रमाणात जागा वाढल्या आहेत. राज्यभरातील ७५ हजार ८५६ शाळांमधील ९ लाख ७१ हजार २०३ जागा प्रवेशासाठी उपलब्ध झाले आहेत. शालेय शिक्षण विभागाने शिक्षण हक्क कायद्याअंतर्गत (आरटीई) केलेल्या बदलांमुळे आरटीई प्रवेश प्रक्रियेत यंदा मोठ्या प्रमाणात जागा वाढल्या आहेत. राज्यभरातील ७५ हजार ८५६ शाळांमधील ९ लाख ७१ हजार २०३ जागा प्रवेशासाठी उपलब्ध झाले असून, येत्या आठवड्यात विद्यार्थी नोंदणीची प्रक्रिया सुरू केली जाणार आहे.

आरटीईअंतर्गत वंचित घटकांतील विद्यार्थ्यांना २५ टक्के राखी जागांवर प्रवेश दिले जातात. खासगी शाळांतील प्रवेशांसाठी शिक्षण विभागाकडून शाळांना शुल्क प्रतिपूर्ती करण्यात येत होती. मात्र शिक्षण विभागाने शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील आरटीई प्रवेशांसाठी शिक्षण हक्क कायद्यात सुधारणा केली. त्यानुसार खासगी शाळांऐवजी प्राधान्याने शासकीय आणि अनुदानित शाळांमध्ये प्रवेश देण्याचे निश्चित करण्यात आले. शासकीय आणि अनुदानित शाळा उपलब्ध नसलेल्या भागातच खासगी शाळेत प्रवेश घेता येणार आहे. या बदलावर शिक्षण क्षेत्रातून, पालक संघटनांकडून बरीच टीका झाली होती. या बदलांनंतर शाळा नोंदणी सुरू करण्यात आली. आरटीई संकेतस्थळावरील माहितीनुसार राज्यात ७५ हजार ८५६ शाळांमध्ये ९ लाख ७१ हजार २०३ जागा प्रवेशासाठी उपलब्ध झाल्या आहेत. मात्र अद्याप विद्यार्थी नोंदणी सुरू करण्यात आलेली नाही.



या पार्श्वभूमीवर शाळा नोंदणीची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. येत्या आठवड्यात विद्यार्थी नोंदणीची प्रक्रिया सुरू केली जाणार आहे, अशी माहिती प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी यांनी दिली. शिक्षण विभागाने आरटीईमध्ये केलेल्या बदलांनंतर आता आरटीई प्रवेशांना पालकांकडून कसा प्रतिसाद मिळतो, हे पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे.

# विजय शिवतारे यांना कार्यकर्त्यांचं खरमरीत पत्र

## 'माझा नेता पलटूराम निघाला, 5 लाख पवार विरोधी मतदारांनी काय करायचं?

**पुणे | प्रतिनिधी**

शिवसेना नेते विजय शिवतारे यांना त्यांच्या कार्यकर्त्यांनी खरमरीत पत्र लिहिलं आहे. विजय शिवतारे बारामती लोकसभा मतदारसंघातून निवडणूक लढवण्यास इच्छुक होते. त्याबाबत त्यांनी घोषणादेखील केली होती. पण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी समजूत काढल्याने त्यांना माघार घ्यावी लागली. विजय शिवतारे यांनी बारामती लोकसभा मतदारसंघातून निवडणुकीत माघार घेतल्याने त्यांच्या समर्थकांनी त्यांना खरमरीत पत्र लिहित या पत्रात विजय शिवतारे यांच्यावर कार्यकर्त्याकडून जोरदार टीका करण्यात आली आहे. आपल्या भूमिकेमुळे कार्यकर्त्यांची नेमकी काय अडचण होते, हे या पत्रात सविस्तर मांडण्यात आलं आहे.

"बापू, १३ मार्च २०२४ रोजी तुम्ही बंडाची भूमिका घेवून बारामती लोकसभेची निवडणूक 'अपक्ष' लढवण्याचा निर्धार केला. त्यानंतर मीडीयाने तुम्हाला अगदी डोक्यावर घेतलं. दर अर्ध्या तासाच्या बुलेटीनला 'तुमची' स्फोटक विधाने गाजू लागली. चॅनेल कुठलंही लावा दिसणार फक्त 'शिवतारे बापू' हे ठरलेलं. त्यानंतर तुम्ही जेजुरीच्या खंडोबाच्या साक्षीने 'एल्गार' पुकारला. पुढे तुमचे दौरे, भेटीगाठी, पत्रकार परिषद गाजू लागल्या. तुम्ही सुद्धा अगदी 'राणा भीमदेवी' थाटाने बोलत राहिलात. आरोप, टीका-टिप्पणी करू लागलात. 'काहीही झालं तरी आता माघार नाही', 'बारामती कोणाची जाहागिरी नाही' यासह तुमची अनेक विधाने गाजली. तुम्हाला समर्थक मिळाले. माय-बाप जनता, पदाधिकारी कार्यकर्ते यांची 'वज्रमूठ' तुम्ही उभी केली. प्रसंगी शिवसेनेचा 'राजीनामा' देवू, पण, आता निर्णय घेतलाय, ही तुमची भूमिका अवघ्या महाराष्ट्रात गाजली. घोडा-मैदान जवळ आलं असताना बापू, तुम्ही 30 मार्च 2024 रोजी अचानक माघार घेतली आणि आमचीही मोठी अडचण झाली", असं कार्यकर्त्यांनी पत्रात लिहिलंय.



**'माझा नेता लेचापेचा निघाला'**

"बापू, मी तुमचा कट्टर समर्थक आहे. तुमच्या राजकीय प्रवासात कायम तुमच्या पाठीशी उभा असतो आणि राहीन सुध्दा. तुम्ही म्हणाल तसं आजपर्यंत करीत आलो आहे. २०१९ ला सुध्दा अजित पवार यांच्या समर्थकांशी तुमच्यामुळे भांडलो आहे. कारण, तुम्ही माझे नेते आहात. पण, काल माझा नेता असा संधीसाधू, लेचापेचा, छक्के पंजे करणारा आणि पोटात एक आणि ओठात एक असणारा निघाला, याचं फार वाईट वाटलं. बापू, ज्या मीडीयाने तुम्हाला डोक्यावर घेतलं, त्याच मीडीयाने तुमची लया फार घालवून टाकलं. सोशल मीडीयात तर तुम्हाला 'महाराष्ट्राचा पलटूराम' म्हणून 'हॅशटॅग' फिरवला जात आहे. 'पुरंदरचा मांडवली सम्राट', 'पाकीट भेटलं का?', 'घुमजाव', 'शिवतारे जमी पर', 'चिऊतारे', 'शेवटी, आपला आवाका दाखविला', '५० खोके शिवतारे ओके', अशा खोचक कंमेंटचा सोशल मिडीयात मुसळधार पाऊस पडतो आहे", असं कार्यकर्त्याने पत्रात लिहिलंय.

**'फाडा पोस्टर निकला चूहा'**

"अजित पवारला माझा आवाका कळेल? म्हणणारे तुम्ही आवाका दाखविण्याच्या आधीच 'शेपूट' घातलंत. मुख्यमंत्र्यांना माझ्यामुळे अडचण होत आहे, हे खतगावकर यांनी सांगितले. असं बाळबोध समर्थन करणाऱ्या विजय शिवतारेंना हे आधी समजलं नव्हतं का? आता त्या ५ लाख ८० हजार पवार विरोधी मतदारांनी नेमकं काय करायचं? हे तुम्ही सांगू शकाल का? तुम्ही स्वतः हा घटनाक्रम घडवून आणला की, तुमचा बोलविता धनी दुसराच कुणी होता? तुम्ही कुणाची स्क्रिप्ट वाचत होतात? आता तुमची वैयक्तिक भूमिका काय? तुमची राजकीय विश्वासार्हता शिल्लक आहे का?

### 5 लाख 80 हजार मतदारांनी आता नेमकं काय

"अजित पवारांची गुर्मी तशीच आहे. ते उर्मट आहेत. पण, अजित पवारांना तो पश्चात्तापही नाही. जणू काही लोकांना फसवणे हा त्यांचा जन्मजात अधिकार असल्यासारखे ते वागत आहेत. इथून मतदान घेऊन त्या जोरावर राज्यात, देशात ब्लॅकमेलिंग केलं जात आहे. हा ब्रह्मराक्षस आम्हीच तयार केला आहे. या पापाचं परिमार्जन आम्हा मतदारांनाच करावं लागेल. या रामायणातला रावणाच्या विरोधात लढणारा रामाच्या बरोबर असणारा बिभीषण विजय शिवतारे आहे, अशीही टीका बापू तुम्हीच केली होती. मात्र, आज तुम्हाला अजित पवारांचा काय साक्षात्कार झाला आहे? आता तुम्ही रामायणातले बिभिषण आहात की नाही? हेही आम्हाला कळू द्या. बापू, पवारांच्या विरोधातल्या ५ लाख ८० हजार मतदारांनी आता नेमकं काय करायचं?", असा सवाल कार्यकर्त्यांनी केलाय. "आता तुम्हाला अजित पवार उर्मट व नालायक वाटत नाहीत का? तुमच्याचं भाषेत त्यांची गुर्मी आणि माज उतरला आहे का? सुनेत्रा पवार या अजित पवारांच्या पत्नी आहेत, म्हणून आम्ही त्यांना मतदान द्यायचं का? त्यांचं कॉलिफिकेशन काय? असा प्रश्न तुम्हीचं उपस्थित केला होता. मग आता आम्ही मतदार म्हणून सुनेत्रा वहिनींना मतदान कारायचं का आणि कशासाठी? यावरही बापू तुम्हीचं अधिकारवाणीने प्रकाश टाकला तर बरं होईल", असं पत्रात म्हटलं आहे.

# मुरलीधर मोहोळांना विविध स्तरातून वाढता पाठिंबा

## प्रचाराचे नियोजन करत समाजातील विविध घटक, समाज, प्रतिष्ठित व्यक्तिंची भेट

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे लोकसभा मतदार संघातील महायुतीचे उमेदवार मुरलीधर मोहोळ यांनी उमेदवारी जाहीर झालेल्या दिवसापासून प्रचारात जोरदार आघाडी घेतली आहे. यादरम्यान, त्यांना विविध स्तरातून पाठिंबा मिळत असल्याचे चित्र आहे. दुसरीकडे महाविकास आघाडीचे उमेदवार रवींद्र धंगेकर यांच्या प्रचाराला अजून पाहिजे तसा जोर आलेला दिसत नाही. पक्षांतर्गत आणि महाविकास आघाडीतील सुंदोपसुंदी यामुळे त्यांच्या प्रचारात समन्वयाचा अभाव दिसून येत आहे.

मुरलीधर मोहोळ यांनी पहिल्या दिवसांपासून प्रचाराचे नियोजन करत समाजातील विविध घटक, समाज, प्रतिष्ठित व्यक्तिंची भेट घेऊन त्यांचे आशीर्वाद घेतले. त्यांना खेळाडू, कलाकार, पहिलवान अशा विविध क्षेत्रातून त्यांना उत्स्फूर्त पाठिंबा मिळत आहे.



सी.के. नायडू, डी.बी. देवधर आणि विजय हजारेंसारख्या खेळाडूंना घडवण्यात मोठा वाटा असलेल्या पुण्यातील पीवायसीच्या पदाधिकाऱ्यांची भेट घेत मोहोळ यांनी पुणे शहरात व्हिजन, भविष्यातील शहराच्या गरजा आणि पुढील ५० वर्षांचे नियोजन याबाबतची माहिती पदाधिकाऱ्यांना देत मोदी सरकारने पुणे शहरासाठी काय-काय केलं? याचीही माहिती दिली. शिवाय पदाधिकाऱ्यांचीही अपेक्षा जाणून घेतल्या. यावेळी मोहोळ यांच्या पाठीमागे खेळाडूंची ताकद उभी करण्याची ग्वाही देण्यात आली.

महाराष्ट्र केसरी, हिंदकेसरी, विविध तालमींचे वस्ताद, राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय कुस्तीपटू यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीमध्ये तर मूळचे पहिलवान असलेले मुरलीधर मोहोळ यांचा प्रचार करण्याचा निर्धार मल्लांनी व्यक्त केला.

दरम्यान, रोज विविध समाजाच्या गाठीभेटी घेत मोहोळ प्रचार करत आहेत. त्यामध्ये त्यांना जाट समाज, सिरवी क्षत्रिय समाज, श्री गोडवाड सिरवी क्षत्रिय समाज अशा समाजातील विविध स्तरातून पाठिंबा मिळत आहे.

मुरलीधर मोहोळ यांनी पहिल्या दिवसांपासून प्रचाराचे नियोजन करत समाजातील विविध घटक, समाज, प्रतिष्ठित व्यक्तिंची भेट घेऊन त्यांचे आशीर्वाद घेतले. त्यांना खेळाडू, कलाकार, पहिलवान अशा विविध क्षेत्रातून त्यांना उत्स्फूर्त पाठिंबा मिळत आहे.

### प्रश्न व निवेदन याचा लगेचच पाठपुरावा...

**» अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळ, अखिल भारतीय नाट्य परिषद, ऑल इंडिया आर्टिस्ट असोसिएशन, मेघराजराजे भोसले, रमेश परदेशी यांच्या पुढाकाराने कलाकार-तंत्रज्ञ यांच्या स्नेह मेळाव्याचा आयोजन करण्यात आलं होतं. या कार्यक्रमास प्रमुख मार्गदर्शक म्हणून लेखक दिग्दर्शक प्रवीण तरडे विनोद सातव आणि मेघराज राजेभोसले यांनीही मार्गदर्शन केले. याला उपस्थिती लावत मोहोळ यांनी उपस्थित कलाकारांनी यापूर्वी मांडलेले प्रश्न व निवेदन याचा लगेचच पाठपुरावा करून ते पूर्ण करण्याची ग्वाही दिली. तर कलाकारांनीही मोहोळ यांना पाठिंबा दिला.**

# मोहोळ यांच्या मताधिक्यासाठी मॅरेथॉन बैठका

## दोन दिवस भाजपा पुणे शहरच्या सर्व आघाड्यांच्या सविस्तर बैठका घेऊन आढावा

**पुणे | प्रतिनिधी**

लोकसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार मुरलीधर मोहोळ यांचे मताधिक्य वाढविण्यासाठी राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण, वस्त्रोद्योग आणि संसदीय कार्य मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी सर्व सुत्रे आपल्या हाती घेतली आहेत. दोन दिवस पक्षाच्या सर्व आघाड्यांच्या बैठका घेऊन मताधिक्य वाढविण्यासाठी पदाधिकाऱ्यांनी काम करावे, अशा सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

लोकसभा निवडणुकीसाठी प्रचाराला वेग मिळाला आहे. पुणे लोकसभा मतदारसंघातून महायुतीने मुरलीधर मोहोळ यांना उमेदवारी दिली आहे. त्यामुळे निवडणुकीत महायुतीचे उमेदवार मुरलीधर मोहोळ यांचे मताधिक्य वाढविण्यासाठी नामदार चंद्रकांतदादा पाटील यांनी सर्व सूत्रे आपल्या हाती घेतली आहेत. शुक्रवारी महिला मोर्चा, ओबीसी मोर्चा, व्यापारी आघाडी, मंडल अध्यक्ष, विस्तारक सोशल मीडिया आणि आयटी सेल यांची बैठक घेतली. शनिवारी अनुसूचित जाती मोर्चा, झोपडपट्टी आघाडी, वैद्यकीय आघाडी, पर्यावरण आघाडी, उत्तर व दक्षिण भारतीय आघाडी, अल्पसंख्याक आघाडी, सहकार, पायाभूत सुविधा, शिक्षक भटके विमुक्त आघाडी यांच्या पदाधिकाऱ्यांच्या बैठका घेऊन निवडणूक तयारीचा आढावा घेतला. तसेच, पदाधिकाऱ्यांच्या सूचना देखील जाणून घेतल्या.

नामदार चंद्रकांतदादा पाटील म्हणाले की, देशाचे लोकप्रिय पंतप्रधान माननीय नरेंद्र मोदीजी यांनी गेल्या दहा वर्षांत सर्वसामान्यांना केंद्रस्थानी ठेवून अनेक लोककल्याणकारी योजना राबविल्या आहेत. तसेच, वर्षानुवर्षे प्रलंबित अनेक विषय मार्गी लावले आहेत. आपल्या मानबिंदूंची पुनर्स्थापना केली आहे. त्यामुळे त्यांचे कार्य सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवावे. राज्य सरकारने ही अनेक जटिल विषय मार्गी लावले आहेत. आर्थिक दृष्ट्या दुर्बल कुटुंबातील मुलींना उच्च शिक्षण घेणे सोपे व्हावे यासाठी; आठ लाखांपर्यंत उत्पन्न असलेल्या कुटुंबातील मुलींना शिक्षण मोफत केले. आद्य क्रांतिगुरु लहुजी वस्ताद साळवे यांचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक उभारण्यासाठी राज्य सरकारने पुढाकार घेऊन निधी उपलब्ध करून दिला. नुकतेच त्याचे भूमिपूजन देखील झाले.




ते पुढे म्हणाले की, कोविड काळात मुरलीधर मोहोळ यांनी महापौर नात्याने पुणे शहराला केले काम फारच परिणामकारक होते. त्यांच्या कार्यकुशलतेमुळे पुणे शहराने कोविडवर यशस्वी मात केली. पुणेकरांना याची जाणीव आहे. त्यामुळे मोदीजींना पुन्हा पंतप्रधान होण्यासाठी आणि मुरलीधर मोहोळ यांना खासदार बनविण्यासाठी पुणेकर मतदान करणारच आहेत. पण तरीही कार्यकर्त्यांनी जास्तीत जास्त मतदारांपर्यंत पोहोचून मुरलीधर मोहोळ यांचे मताधिक्य वाढविण्यासाठी पदाधिकाऱ्यांनी काम करावे, अशा सूचना दिल्या.

शहराध्यक्ष धीरज घाटे म्हणाले की, देशातील सर्वसामान्यांचा माननीय मोदीजींवर दृढ विश्वास आहे. मोदीजींनी सर्वसामान्यांचा नेहमीच विचार केला. माननीय मोदीजींच्या नेतृत्वात केंद्र सरकारने गेल्या दहा वर्षांच्या काळात देशात केलेले काम, विकास कामे सोशल मीडियाच्या माध्यमातून जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचविण्यात यावे, असे आवाहन केले. या बैठकीला शहराध्यक्ष धीरज घाटे, प्रदेश उपाध्यक्ष राजेश पांडे, पुणे लोकसभा निवडणूक प्रभारी श्रीनाथ भिमाले, सरचिटणीस पुनीत जोशी, राघवेंद्र बापू मानकर, रवी साळेगावकर यांच्या सह भाजपचे सर्व प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. दरम्यान, यावेळी सर्वच आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी मुरलीधर मोहोळ विक्रमी मतांनी विजयी होतील, असा संकल्प व्यक्त केला

### सीएए निर्वासितांना नागरिकत्व देणारा कायदा

देशाचे लोकप्रिय पंतप्रधान माननीय नरेंद्र मोदीजी यांच्या नेतृत्वात केंद्र सरकारने आणलेला नागरिकता सुधारणा कायदा हा पाकिस्तान, बांगलादेश, अफगाणिस्तान आदी देशातील त्रासाला कंटाळून भारतात आलेल्या निर्वासित सहा धर्मियांना नागरिकत्व देणारा कायदा आहे. कोणाचंही नागरिकांचं नागरिकत्व काढून घेतलं जाणार नाही. त्यामुळे सीएएबद्दल जनजागृती करावी, असे आवाहन ही त्यांनी यावेळी केले.

### विरोधकांच्या राज्य घटना बदलाच्या अपप्रचाराला खोडून काढा

विरोधकांकडे मुद्दे नसल्याने, ते राज्यघटना बदलाचा अपप्रचार करत आहेत. उलट कॉंग्रेसने स्वतः च्या स्वार्थासाठी ४० वेळा घटना बदल केला. इंदिरा गांधी यांनी देशात आणीबाणी लागू करुन हुकूमशाही आणली. त्यामुळे हे सर्व जनतेसमोर मांडून विरोधकांचे मुद्दे वेळीच खोडून काढा, असे आवाहन ही त्यांनी यावेळी केले.

# पवना नदी प्रदूषित करणाऱ्या चौघांवर गुन्हा

## नदीच्या पात्रात राडारोडा टाकणाऱ्या महिलेसह चौघांविरोधात गुन्हा दाखल

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहरातून वाहणाऱ्या पवना नदीचे पात्र 24 किलो मीटर आहे. किवळेपासून दापोडीपर्यंत पवना नदीचे प्रदूषण वाढले आहे. नदीलगतच्या भागात किवळे, पुनावळे, रावेत, ताथवडे, वाल्हेकरवाडी, थेरगाव, चिंचवडगाव, काळेवाडी, पिंपरी, दापोडी, पिंपळेगुरव, सांगवी, कासारवाडी व दापोडीपर्यंत पाण्याचे प्रदूषण वाढल्याचे दिसून येते. पवना नदी सातत्याने फेसाळत आहे. नदीतील पाण्यावर फेस तरंगतो. नदी प्रदूषित झाली आहे. यंदाच्या पावसाळ्यात चारवेळा नदी फेसाळली. दोनदिवसांपूर्वी थेरगावातील केजुदेवी बंधारा ते चिंचवडगावातील श्री मोरया गोसावी घाट या दरम्यान पवना नदी मोठ्या प्रमाणात फेसाळली. मासे मृत पावले. सांडपाणी, रसायनमिश्रित पाणी नदीपात्रात सोडल्याने सातत्याने नदी फेसाळत आहे. पवनामाईची दुरावस्था झाली आहे.

शहरातून वाहणाऱ्या पवना नदीच्या पात्रात राडारोडा टाकणाऱ्या एका महिलेसह चौघांविरोधात वाकड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. राडारोडा टाकून नदी प्रदूषित केल्याचा ठपका त्यांच्यावर ठेवण्यात आला आहे.

संभाजी निवृत्ती नढे (वय ६४), तुकाराम दामोदर नढे (वय ५५), गणेश ज्ञानेश्वर नढे (वय ३५, सर्व रा. काळेवाडी) आणि एका महिलेविरोधात गुन्हा दाखल केला आहे. याप्रकरणी महापालिकेचे आरोग्य निरीक्षक अमोल गणपत गोरखे (वय ४७, रा. आकुर्डी) यांनी वाकड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

आरोपींनी गट नंबर ९६ रहाटणी, काळेवाडी येथील पवना नदीपात्रामध्ये बांधकामाचा राडारोडा टाकला. यामुळे नदी प्रदूषित झाली आहे. रहिवाशांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर केला आहे. त्यामुळे आरोपींवर पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ कलम ३, १५ नुसार गुन्हा दाखल केल्याचे पोलिसांनी सांगितले.



### महापालिकेकडून धडक कारवाई...

पिंपरी-चिंचवड शहरातून वाहणाऱ्या पवना, इंद्रायणी आणि मुळा नदीपात्रामध्ये राडारोडा आणि मातीचा भराव टाकण्याचे प्रकार समोर आले आहेत. त्यामुळे नदी पात्र अरुंद होत आहे. राडारोडा टाकणाऱ्यांवर महापालिकेच्या पर्यावरण अभियांत्रिकी विभागाने धडक कारवाईला सुरुवात केली आहे. राडारोडा टाकणाऱ्यांकडून एक लाख १५ हजार रुपयांचा दंड वसूल केला आहे. आता गुन्हे दाखल करण्यास सुरुवात केली आहे. नदीपात्रात भराव टाकल्यामुळे नदीपात्र अरूंद होत आहे. तसेच नदीप्रदूषण देखील होत आहे. यापुढे नदीपात्रात भराव टाकणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे.

शहरातील विविध भागांत दररोज ट्रक, ट्रॅक्टर, डंपर, टेम्पो तसेच आरएमसी प्लांटच्या मिक्सर गाड्या अशा वाहनांतून नदीच्या कडेला राडारोडा टाकण्यात येत होता. यामध्ये वाहनचालक शिवा राठोड, उमेश बारणे, वेदांत देसाई, आर.डी. वाघोले, तेजस उक्के, प्रकाश चौधरी, कांतीलाल पवार यांची वाहने पकडली. त्यांच्याकडून एक लाख १५ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला.

नदीमध्ये भराव टाकणाऱ्या जागामालक, गाडीमालक, वाहनचालकांवर दंडात्मक कारवाई करण्यात येईल. तसेच वाहनेही जप्त करण्याचा इशारा महापालिकेच्या पर्यावरण अभियांत्रिकी विभागाचे सह शहर अभियंता संजय कुलकर्णी यांनी दिला आहे.

# खासदार डॉ. अमोल कोल्हेंची दमदार फटकेबाजी

## घड्याळ सुटल म्हणून वेळ जुळेना झाली, डॉ. अमोल कोल्हे यांच्या वक्तव्याला उत्स्फूर्त दाद

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्यातील खेड चे आमदार दिलीप मोहिते यांच्या पुतणीचा शुभविवाह काल थाटामाटात संपन्न झाला. या निमित्ताने खासदार डॉ.अमोल कोल्हे,माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील, जुन्नर चे माजी आमदार शरद सोनवणे यांनी भेट दिली.

पुणे जिल्ह्यातील खेड चे आमदार दिलीप मोहिते यांच्या पुतणीचा शुभविवाह काल थाटामाटात संपन्न झाला. या निमित्ताने खासदार डॉ.अमोल कोल्हे,माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील, जुन्नर चे माजी आमदार शरद सोनवणे यांनी भेट दिली. डॉ.अमोल कोल्हे यांनी शुभविवाह प्रसंगी शुभेच्छा देताना, "घड्याळ सुटल म्हणून वेळ जुळेना झाली. पण वधू, वरांच्या आयुष्यात समाधान,सुखाची तुतारी वाजावी "असे सांगितले.त्यानंतर आमदार दिलीप मोहिते व इतर पदाधिकारी, कार्यकर्ते,उपस्थित नागरिक, वऱ्हाडी मंडळी यांच्यात हास्यकल्लोळ उमटला. डॉ.अमोल कोल्हे यांच्या वक्तव्याला आमदार दिलीप मोहिते यांनी जोरात हसून उत्स्फूर्त दाद दिली.

माजी खासदार आढळराव पाटील यांनीही शुभविवाहा निमित्ताने भेट दिली होती त्यावेळी त्यांनी शुभेच्छापर विचार व्यक्त केले. आमदार मोहिते यांचे कौतुक करून मोहिते यांचा उल्लेख" माझे स्नेही" असा केला. आढळराव पाटील आणि आमदार मोहिते हे एकाच पक्षात राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटात असल्याने आता त्यांचा स्नेह वाढणार आहे.आमदार मोहिते व माजी खासदार आढळराव पाटील यांनी दिलखुलास चर्चा केली. माजी आमदार सोनवणे यांनी शुभविवाहानिमित्ताने भेट दिली त्यावेळी त्यांनी शुभेच्छापर विचार व्यक्त करताना आमदार मोहिते यांचे कौतुक केले.



माजी आमदार सोनवणे यांनी त्यांच्या भाषणात आमदार मोहिते हे स्पष्ट वक्ते व शब्दाला पक्के आहेत असे सांगितले.त्यामुळे आमदार मोहिते यांनी माजी खासदार आढळराव पाटील यांना दिलेला शब्द नक्की ते पूर्ण करतील असेच जणू काही सांगितले. शुभविवाहाचे व्यासपीठ म्हणजे राजकीय टोलेबाजीचे व्यासपीठ ठरले.थोडीफार फटकेबाजी झाली. उपस्थितांनाही हसू आले. लोकसभेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर माजी खासदार आढळराव पाटील हे लोकसभेचे महायुतीचे उमेदवार आहेत तर विद्यमान खासदार डॉ. अमोल कोल्हे हे महाविकास आघाडीचे राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे उमेदवार आहेत. मोहिते यांच्या पुतणीच्या शुभविवाहा निमित्ताने अनेक नेत्यांनी आवर्जून भेट दिली.

यावेळी आमदार दिलीप मोहिते यांच्या पत्नी जिल्हा परिषदेच्या माजी सदस्या सुरेखा मोहिते,खेड तालुका राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष कैलास सांडभोर, शिवसेनेचे उद्धव ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख अशोक खांडेभराड व तालुक्यातील इतर पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते. इतर पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते

### उपस्थितांना पडलेला प्रश्न...

» येत्या लोकसभेच्या निवडणुकीत आमदार मोहिते महायुतीच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवाराला किती मदत करतात आणि खेड तालुक्यातून किती मताधिक्य देतात याकडे महायुतीच्या नेत्यांचे अधिक लक्ष आहे असे बोलले जाते. माजी खासदार आढळराव पाटील यांनी मोहित्यांशी असलेला स्नेह अधिक बळकट करण्याचा प्रयत्न केला आहे. खासदार डॉ.अमोल कोल्हे यांनी त्यांच्या भाषणात घड्याळ आणि तुतारी या पक्ष चिन्हांचा उल्लेख करून घड्याळाची वेळ जुळेना झाली असा टोला देऊन नेमके काय सूचित केले आहे. आणि सुखाची तुतारी वाजावी असे बोलून नेमका काय संदेश दिला आहे हा मात्र उपस्थितांना पडलेला प्रश्न आहे.

# नाणे मावळात संजोग वाघेरेंच्या प्रचारार्थ ग्रामस्थांशी संवाद

## गावोगावी पदाधिकारी, कार्यकर्त्यांकडून बैठका सुरु : 'मशाल' चिन्ह प्रत्येकापर्यंत पोहोचविण्याचा निर्धार

**पुणे | प्रतिनिधी**

मावळ लोकसभा मतदारसंघातील शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांच्या प्रचारार्थ नाणे मावळात गावोगावी संवाद बैठका सुरू आहेत. निष्ठावंत शिवसैनिकासह महाविकास आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते 'मशाल' चिन्ह प्रत्येकापर्यंत पोहोचवत आहेत.

मावळ लोकसभा मतदारसंघात संजोग वाघेरे पाटील यांचा झंझावाती प्रचार दौरा सुरू आहे. संजोग वाघेरे पाटील यांच्यासह शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षासह महाविकास आघाडीच्या घटक पक्षाचे पदाधिकारी, सर्व सहकारी मंडळी यांनी उत्साहात प्रचार सुरू केला आहे. मावळ तालुक्यातील नाणे मावळ परिसरातील कोंडीवडे, उकसान, गोवित्री, वळवती, कांब्रे,



तसेच तळेगाव दाभाडेजवळी माळवाडी या भागात गावात सदिच्छा भेट देत संजोग वाघेरे पाटील यांच्या सहका-यांनी गावक-यांशी संवाद साधला.

मावळ लोकसभा मतदारसंघातील शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांच्या प्रचारार्थ नाणे मावळात गावोगावी संवाद बैठका सुरू आहेत. निष्ठावंत शिवसैनिकासह महाविकास आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते 'मशाल' चिन्ह प्रत्येकापर्यंत पोहोचवत आहेत.

### 'मशाल' चिन्ह प्रत्येकापर्यंत पोहोचविण्याचा निर्धार...

मावळ तालुक्यातील ग्रामीण भागात गावोगावी अशा प्रकारे वाघेरे पाटील यांचा प्रचार सुरू आहे. विविध गावांमध्ये दिवसभर व रात्री उशिरापर्यंत ग्रामस्थांच्या बैठका घेतल्या जात आहेत. संजोग वाघेरे पाटील यांचे परिचय पत्रक व त्यांच्या संदेशाचे पत्र ग्रामस्थ, महिला व युवा वर्गापर्यंत जात आहे. मावळ लोकसभा मतदारसंघात संजोग वाघेरे पाटील हे नाव आणि मशाल चिन्ह प्रत्येक मतदारापर्यंत पोहोचत आहे. मावळ लोकसभेचे पुढचे खासदार संजोग वाघेरे पाटीलच असतील, असा विश्वास सर्वांकडून मिळत आहे.